CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 4 Aug 23, 2024

आता १५ सप्टेंबरपर्यंत भरा जमिनींचा 'भाडेपट्टा'

अतिरिक्त शुल्कासाठी सिडकोचा निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

नवी मुंबई : थकीत असलेले भरमसाठ अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क आणि मावेजा रकमेच्या वसुलीसाठी जाहीर करण्यात आलेल्या अभय योजनेला राज्य शासनाच्या निर्णयानुसार सिडकोने आता १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ जाहीर केली आहे. या योजनेची मुदत ३० जून रोजी संपुष्टात आली आहे. त्यामुळे आणखी काही दिवस मुदत मिळावी, अशी मागणी विकासक आणि गुंतवणूकदारांकडून केली जात होती. अखेर राज्य शासनाच्या मान्यतेने सिडकोने १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

सिडकोने भाडेपट्ट्याने जमिनींचे वाटप केले आहे. निर्धारित कालावधीत जमिनीचा विकास करणे संबधितांवर बंधनकारक असते. मात्र अनेक विकासकांनी या अटीचे पालन केलेले नाही. त्यांना बांधकाम नव्याने बांधकाम परवानगी घेताना अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क भरावे लागते. यासंदर्भात अनेक प्रकरणे सिडकोकडे प्रलंबित असल्याने विकासाला सुद्धा अडथळा होत आहे. ही अडचण लक्षात घेऊन १२ जानेवारीच्या आदेशान्वये बांधकाम मुदतवाढीसाठी देय असलेल्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क वसुलीबाबत अभय योजना जाहीर केली होती.

अभय योजनेला पुन्हा मुदतवाढ

योजनेची मुदत ३० जूनपर्यंत होती. मात्र या कालावधीत या योजनेला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे १५ ऑगस्टपर्यंत मुदवाढ मिळावी, अशी मागणी नवी मुंबईसह पनवेल विभागातील विकासक आणि राजकीय नेत्यांनी राज्य शासनाकडे केली होती. त्याअनुषंगाने या योजनेला १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

'या' जमीनधारकांनाही होईल लाभ

- नवी मुंबईसह सिडकोच्या नवीन शहरे प्रकल्पांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नाशिक, नांदेड व नागपूर येथील जमीनधारकांना या अभय योजनेचा फायदा घेता येणार आहे.
- याअंतर्गत अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क, सेवा शुल्क व विकास शुल्कामध्ये ५० टक्के सवलत दिली जाणार आहे.
- त्यामुळे अर्ज प्रलंबित असलेल्या जमीनधारकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिडकोच्या संबधित विभागाने केले आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 1 Aug 23, 2024

सिडकोने पळविले चोरट्यांच्या तोंडचे 'पाणी'

खारघरमधील ३८ बूस्टर पंप केले जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

नवी मुंबई : सिडको क्षेत्रातील काही नोडमध्ये पाणी समस्या आहे. विशेषत: खारघरच्या काही भागांत पाण्याचे वितरण आणि तूट यात मोठी तफावत निर्माण झाली आहे. अनेक सोसायट्यांनी पाणी खेचण्यासाठी बूस्टर पंपचा वापर सुरू केला. त्यामुळे काही वसाहतींना पुरेसा पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे सिडकोच्या संबंधित विभागाने अशा बूस्टर पंपविरोधात गेल्या आठवड्यापासून धडक कारवाई मोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत आतापर्यंत ३८ बूस्टर पंप जप्त करण्यात आले आहेत.

सिडकोने कार्यक्षेत्रात केलेली पाणी कपात १ ऑगस्टपासून रद्द केली आहे. असे असले तरी खारघरमधील सेक्टर ३४ आणि ३५ सह अन्य काही वसाहतींना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या रहिवाशांच्या तक्रारी आहेत. सिडकोच्या संबंधित विभागाने या तक्रारींची शहानिशा केली असता अनेक सोसायट्यांनी बूस्टर पंप लावल्याचे निदर्शनास आल्याने त्यावर कारवाई करण्यात आली आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

दैनिक किल्ले रायगड दिनांक : २३-०८-२०२४

खारघर मधील अनधिकृत ३५ बुस्टर पंप जप्त सिडको पाणी पुरवठा विभागाद्वारे कारवाई

पनवेल, दि. २२ (वार्ताहर) : खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये जलवाहिनीवर बेकायदेशीरपणे लावलेले अनधिकृत बुस्टर पंप हटविण्याची मोहीम सिडको पाणी पुरवठा विभागाने सुरु केली असून, गेल्या आठवड्याभरात ३५ बुस्टर पंप जप्त करण्यात आले आहेत.

दरम्यान, सिडको अखत्यारीतील तळोजा, कामोठे, कळंबोली, पनवेल, करंजाडे, उलवे आणि द्रोणागिरी आदी नोड मधील गृहनिर्माण सोसायटींमध्ये अनधिकृतपणे लावण्यात आलेले बुस्टर पंप तात्काळ काढावे अन्यथा अनधिकृत बुस्टर पंप असलेल्या हौसिंग सोसायटींवर कारवाई केली जाईल, असा इशारा सिडको तर्फे देण्यात आला आहे. खारघर परिसरात नियमितपणे पाणी पुरवठा होत आहे. दरम्यान, १ ऑगस्ट पासून २० टक्के पाणी कपात सिडको पाणी पुरवठा विभागाने रद्द केली असूनही, काही सेक्टर मधील सोसायटींमध्ये कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याच्या तक्रारी सिडकोकडे प्राप्त होताच सिडको पाणी पुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांनी पाहणी केली असता खारघर सेक्टर-३४ आणि सेक्टर-३५ मधील गृहनिर्माण सोसायटींमध्ये सिडको जलवाहिनीवर बुस्टर पंप (मोटार) लावून पाणी घेत असल्याचे निदर्शनास येताच खारघर येथील काही सोसायटी मधील ३५ बुस्टर पंप सिडको'ने जप्त केले आहेत. दरम्यान, तळोजा, कामोठे, कळंबोली, पनवेल, करंजाडे, उलवे आणि द्रोणागिरी वसाहतीत सिडको जलवाहिनीवर बुस्टर पंप लावून पाणी घेत असल्यास बुस्टर पंप तात्काळ काढण्यात यावेत, असे आवाहन करतानाच बुस्टर पंपद्वारे पाणी घेणाऱ्या सोसायटींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल', अशी तंबी सिडको पाणी पुरवठा विभाग तर्फे देण्यात आली आहे.